# भाषेविषयी तीन गोष्टी

भाषेच्या बाबतींत तीन गोष्टी लक्षात घेण्यासारख्या आहेत. एक, भाषेत शब्द असतात, शब्दांना अर्थ असतात आणि अर्थामध्ये ज्ञान साठलेले असते. भाषा जसजशी वृध्दिंगत होते, तिचा शब्दसंग्रह जसजसा वाढत जातो, तसतशी ज्ञानाची पातळी वाढत जाते. कालाच्या ओघांत शब्दांचे अर्थ बदलतात, पण जुने अर्थ, ज्ञान म्हणून अस्तित्वात असतातच. कित्येकदा नवनवीन शास्त्रांच्या उगमांबरोबर त्यांच्यातील नव्या अर्थासाठी नवे शब्दही निर्माण होत जातात, ते आपापले नवे अर्थही घेऊन येतात. त्यांतून पुन्हा ज्ञान विस्तारत जाते. या प्रक्रियेत कित्येकदा असेही घडते की, नव्या अर्थासाठी जुन्याच शब्दांचा वापर होऊन, हे जुने शब्द नवअर्थाने अलंकृत होतात. (उदा. इंग्रजीतला 'माऊस' हा शब्द!) आणि त्यांबरोबर ज्ञानाची पातळी वाढतच जाते. भाषा हे ज्ञाननिर्मितीचे साधन बनते ते असे.

दोन, भाषेत शब्द असतात, शब्दांना अर्थ असतात आणि अर्थामध्ये ज्ञान साठलेले असते. लहान बालके जेव्हा आपली भाषा आत्मसात करीत असतात, तेव्हा घडत असलेली प्रक्रिया ही अशीच 'स्व'च्या पातळीवरील ज्ञाननिर्मितीची (किंवा ज्ञानप्राप्तीची आणि तिच्या आकलनाची म्हणा हवं तर!) प्रक्रिया असते. म्हणजे असे की, मुले परिसरातील अन्य व्यक्तींकडून ऐकून शब्द ग्रहण करतात. हे शब्द अर्थाचे वसन लेवूनच आलेले असतात. त्यामुळे मुलांना अर्थाचे आकलन आपोआपच होत जाते; एवढेच नव्हे तर हे आकलन बहुदा, कायमस्वरूपी म्हणजे कायम लक्षात राहणारे असते. अर्थासहित शब्दांची ओळख ही गोष्ट नैसर्गिक सहजतेने होत असल्याने, ती मुलांना कष्टप्रद नसते. यांत मुलांचे श्रम फारसे खर्ची पडत नसल्यामुळे ही शब्दसंग्रहाची प्रक्रिया वेगाने घडून येत असते. शब्दसंग्रहाचा आणि शब्दार्थरूपी ज्ञानप्राप्तीचा हा कारखाना, या वयांत अगदी जोरात चाललेला असतो. केवळ शब्द मोठ्या संख्येने ऐकायला मिळणे, हा कच्चा माल मात्र सातत्याने मिळत राहावा लागतो. मुले आपली पहिली भाषा-परिसर भाषा बोलायला लागतात, तेव्हा ज्ञानाच्या बाबतीतली पुढची पायरी मुले चढतात. आता मुले पूर्वीच ओळख झालेले शब्द त्यांच्या अर्थासहित वापरायला म्हणजे, मुखावाटे उच्चारायला लागतात. (थोडीफार अर्थाची गल्लतही होते काही वेळा) यांतून शब्दार्थ पक्के होतात; त्यांकरवी त्यांतील ज्ञानही पक्के होत जाते.

भाषा ऐकून समजणे आणि समजलेले बोलून व्यक्त करता येणे, या दोन, भाषेच्या मूलभूत क्षमता आहेत. पहिल्या भाषेच्या विकसित होत जाणाऱ्या या दोन क्षमतांच्या आधारावरच, मुलांची पुढील ज्ञानाची इमारत

उभी राहत असते. अर्थाची ओळख म्हणजेच जगाची ओळख करून घेणे असते. लहान वयांत आणि आपल्या पहिल्या भाषेतून ही जगाची ओळख नैसर्गिकरित्याच पक्की होत जाते. पहिली भाषा आणि ज्ञानप्राप्ती यांमधील संबंध दृढ होत जातात. पुढे, भाषेकरवी अन्य अनेक विषयांचे 'शिकणे' सुरू होते तेव्हा, ही पहिल्या भाषेतून झालेली जगाची ओळख, किंवा अगदी तांत्रिक भाषेत बोलायचे तर, जगातील आणि जगाविषयीच्या आकळून घेतलेल्या संकल्पना ह्या आधारभूत ठरतात. त्यामुळे साहजिकच आपल्या पहिल्या भाषेतून 'शिकणे' सहजप्राप्त होते; ज्ञानप्राप्तीच्या प्रक्रियेला पोषक ठरते.

तीन, आणखी एक गोष्ट भाषेच्या संदर्भातली लक्षात घेण्यासारखी आहे. आज शिक्षणाच्या क्षेत्रात, मुलांच्या, बोधनेच्या किंवा आकलनाच्या विकासाला (Congnitive development) आणि त्याचबरोबर भावनिकतेच्या विकासाला (emotional development) महत्त्वाचे स्थान दिले जात आहे. मुलांच्या ह्या दोनही विकासांसाठी मूलभूत अट असते ती अन्य व्यक्तींच्या संपर्काची. हा संपर्क केवळ शरीराने जवळ असण्यापुरता पुरेसा नसतो. व्यक्ती-व्यक्तींमधील भाषिक संवाद ही येथे निर्णायक अट असते. म्हणजे, थोडक्यात असे की, भावनिक विकास व आकलनविषयक विकास हा भाषिक संधींशी (संधींच्या संख्यात्मक आणि आशयात्मक बाबींशी) घट्टपणे बांधलेला असतो. ज्यांना, लहानवयापासूनच, अशा संधी मुबलक प्रमाणांत आणि आशय-प्रगल्भतेने प्राप्त होतात, त्यांचा वाढता भाषिक विकास (संख्यात्मक आणि गुणात्मक) हा त्यांच्या आकलनाच्या आणि भावानिकतेच्या विकासाला सहाय्यभूत ठरतो. मात्र, जी मुले पुरेशा प्रमाणांतील अशा संधींना पारखी असतात, त्यांच्या आकलनाच्या आणि भावनिकतेच्या विकासात अडथळे येतात, किंवा असेही लक्षात येते की, शालेय वयांत आणि नंतरही ज्यांना संकल्पनांच्या वगैरे आकलनाच्या बाबतींत तसेच भावनिकरित्या इतरांशी जुळवून घेण्याच्या बाबतींत अडचणी येतात, तेव्हा त्यांचे मूळ आपल्याला लहान वयांतील भाषिक अनुभवांच्या अपुरेपणात शोधता येते !

❖